ज्ञान प्रबोधिनीचे, कुमारांसाठी, कृतिशीलता जोपासणारे मासिक

निव्वळ मासिक नव्हे !... विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनाची चळवळ !!

# छात्र प्रबोधन

*मातृभूमि हे दैवत येथे स्थापियले, पूजिले । त्याग, पराक्रम, सेवा यांचे त्रिदल पदी वाहिले ॥*

ॐ

दिनांक : सौर १२ पौष, शके १९४५
२ जानेवारी २०२४

मा.

सस्नेह नमस्कार,

छात्र प्रबोधनचे शके १९४५ मधील दुसरे वृत्त (सौर आषाढ ते अग्रहायण शके १९४५/जुलै ते डिसेंबर २०२३ या सहा महिन्यांचे वृत्त) आपल्याला पाठवत आहोत. नित्य दिवाळी अंक, दिनदर्शिका, साहित्य मेळावे, कुमार साहित्य संमेलन, शिक्षक शिबिर, विविध स्पर्धा, त्यांच्या पूर्वतयारीसाठी कार्यशाळा व त्यांची बक्षिसे इ. अनेकविध भरगच्च उपक्रमांनी गेले सहा महिने उत्साहात गेले.

हे षण्मासिक वृत्त आपल्याला सादर करताना आनंद होत आहे. (या वर्षातील यापूर्वीचे त्रैमासिक वृत्त खालील चौकटीत क्लिक केल्यावर आपण पाहू शकाल.) वृत्तावरील प्रतिसाद व पुढील काळासाठी आपला सहभाग आणि सहयोग मिळावा यासाठी आवाहन!

सौर चैत्र ते ज्येष्ठ १९४५/ एप्रिल ते जून २३ चे छात्र प्रबोधनचे त्रैमासिक वृत्त पाहाण्यासाठी येथे क्लिक करा.

**सस्नेह आपले**

| रूपाली बापट | शिल्पा कुलकर्णी | महेन्द्र सेठिया |
|---|---|---|
| व्यवस्थापकीय समन्वयक | संपादकीय समन्वयक | विभाग प्रमुख, छात्र प्रबोधन |
| ९४२२९१०९३७ | ९८८१७४४४०६ | ९४०४२२४७०५ |

**संपर्क - छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, ५१० सदाशिव पेठ, पुणे ३०, ☎०२०-२४२०७ १७४/१७५**
www.chhatraprabodhan.org, Email-chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

## शके १९४५ - छात्र प्रबोधन वृत्त - २

### (सौर आषाढ ते अग्रहायण शके १९४५/जुलै ते डिसेंबर २०२३)

❖ **मासिक अंक –** सहा महिन्यांत छात्र प्रबोधनचा विद्यार्थी विशेषांक व ४ नित्य अंक प्रकाशित झाले. सुबोध द्वैमासिकाचा जुलै/ऑगस्टचा अंक प्रकाशित झाला. विद्यार्थी विशेषांकाकरिता इशानी फडके, स्वामिनी हर्षे, मेधज करमरकर या विद्यार्थी मंडळाने अंकाचे काम बघितले. छात्र प्रबोधनचे पाचही नित्य अंक **Chhatraprabodhan Masik** या ॲप वर मोफत उपलब्ध आहेत. छात्र प्रबोधनच्या सौर अग्रहायण/डिसेंबर २०२३ च्या अंकात १० बालकुमार दिवाळी अंकांचा परिचय देण्यात आला.

❖ **दिवाळी अंक व कुमारांसाठी दिनदर्शिका –** छात्र प्रबोधनचा बत्तीसावा नित्य दिवाळी अंक, ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी एकोणिसावा सुबोध दिवाळी अंक आणि तेविसावा इंग्रजी दिवाळी अंक प्रकाशित झाले. त्याचबरोबर खास कुमारांसाठी आठवी दिनदर्शिका – २०२४ प्रकाशित झाली. मराठी नित्य – ११,०००, सुबोध ग्रामीण अंक – १४,०००, इंग्रजी दिवाळी अंक – ५,००० असे एकूण ३०,००० दिवाळी अंक व १०,००० दिनदर्शिका छापल्या. त्यापैकी महाराष्ट्रातून एकूण ६२ केंद्रांनी व ६० शाळांनी मिळून २७,००० अंकांची व ८,००० दिनदर्शिकांची प्रकाशनपूर्व नोंदणी केली. ज्ञान प्रबोधिनी प्रशालेतील ५ वी ते ७ वी च्या विद्यार्थ्यांनी मिळून ३५०० अंकांची प्रकाशनपूर्व नोंदणी केली.

**यानिमित्ताने अनेक जाहिरातदार, देणगीदारांनी दिलेल्या भरीव आर्थिक साहाय्याबद्दल त्यांचे मनापासून आभार!**

खालील मुखपृष्ठांवर क्लिक करून त्या–त्या नित्य अंकांची झलक पाहा...



सुबोध द्वैमासिकाची झलक पाहण्यासाठी येथे क्लिक करा...



दिनदर्शिकेची झलक पाहण्यासाठी येथे क्लिक करा...



खालील मुखपृष्ठांवर क्लिक करून दिवाळी अंकांची झलक पाहा...





गावोगावच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना अंक व दिनर्शिका मिळाल्याचा झालेला आनंद



दिवाळी अंक प्रकाशन


**खालील फोटोंवर क्लिक करून त्या-त्या ठिकाणचे तपशील पाहा...**
















**jpprakashane.org वरून खरेदीसाठी आणि सभासद नोंदणीसाठी येथे क्लिक करा.**

**१. दिवाळी अंक प्रकाशन** – सौर कार्तिक ५, शुक्रवार दिनांक २७ ऑक्टोबर रोजी संचालक कार्यालयांत तीनही दिवाळी अंकांचे व दिनदर्शिकेचे छात्र सहविचार समिती व तीनही अंकांचे संपादकीय सदस्य व मा. संचालक व मा. कार्यवाह यांच्या उपस्थितीत प्रकाशन झाले . तसेच विभागातसुद्धा मा. महेंद्रभाई व सर्व सदस्यांच्या समवेत, संपादक मंडळातील डॉ. कांचनगंगा गंधे आणि शैलजाताई देशमुख यांच्या उपस्थितीत छोटेखानी प्रकाशन झाले. याशिवाय गावोगावी केंद्रांवर व शाळांमध्ये मिळून २५ पेक्षा अधिक ठिकाणी प्रकाशन समारंभ झाले.

**२. दिवाळी अंक वितरण** – ३० व ३१ ऑक्टोबर रोजी सर्व केंद्र व प्रबोधनदूत योजनेतील सर्व शाळांना युवक विभाग व नेतृत्व संवर्धन केंद्रातील युवक-युवतींनी अंकांचे वितरण केले. मराठा आंदोलनाच्या अडथळ्यावर मात करत अनेक केंद्रांवर अंक वेळेपूर्वी म्हणजे शाळांना सुट्टी लागण्या अगोदर पोहचवता आले.

## ❖ पुस्तक निर्मिती व विक्री –

**१. नवीन पुस्तके** – या सहा महिन्यात ३ पुस्तके प्रकाशित झाली.

१. व्यक्तिविकासाशी निगडित : **'पंख फुलवूया प्रतिभे'**चे या पुस्तकाची हिंदी व गुजराथी आवृत्ती पुढील नावाने सप्टेंबर महिन्यात प्रकाशित झाली.

१. **'आओ फैलाएं पंख प्रतिभाके'**, 'પ્રતિભાની પાંખો ફેલાવીએ' ले.नलिनी गुजराथी

२. प्रेरणादायी अनुभवपर : **ध्यासपंथावरील दीपस्तंभ** – ले. शैलजा देशमुख, नीलिमा करमरकर

**२. पूर्वप्रकाशित पुस्तकांच्या पुढील आवृत्त्या**–३ पुस्तकांच्या पुढील आवृत्त्या प्रकाशित

१) **गीता गीताई** – तिसऱ्या आवृत्तीचे पुनर्मुद्रण पहिले (एकूण प्रती ४०००, आज अखेर ३७ हजार प्रतींची विक्री) **२) व्यक्तिविकासासाठी विद्याव्रत भाग १ व २** आवृत्ती पाचवी, (एकूण प्रत्येकी प्रती २०००, आज अखेर २०,००० पुस्तकांची विक्री)

**३. सहा पानी कर्तृत्ववान व्यक्तींच्या कहाण्या** – या संचातील १० पुस्तके छापून आली असून लवकरच या मालिकेतील पुढील ३० पुस्तके छापून येतील. **'जल्लोष वाचनाचा'** या प्रकल्पांतर्गत हा संच प्रकाशित होत आहे. १० पुस्तकांचा संच विक्रीसाठी उपलब्ध आहे. (सवलतीच्या दरात रु. २००/-, मूळ किंमत रु. २५०/-) (४०पुस्तकांचा संच सवलतीत रु. ६०० ला उपलब्ध होईल). वरील फोटोंमध्ये पुस्तकावर क्लिक केल्यास या संचातील पुस्तकांची सूची व एक नमुना पुस्तक पाहायला मिळेल.

## ❖ उपक्रम व योजना –

**१. कुमार साहित्य मेळावे** – पुण्यात ५ ठिकाणी व लातूर परिसरात २१ ठिकाणी २ ते ३ तासांचे छात्र प्रबोधनच्या अंकाभोवती कुमार साहित्य मेळावे घेण्यात आले. त्यामध्ये एकूण १५०० विद्यार्थी सहभागी झाले. शाब्दिक खेळ, मौनवाचन, चर्चा, प्रकट वाचन, रसग्रहण, सादरीकरण इ. गोष्टी मेळाव्यांमध्ये घेण्यात आल्या.

**२. कुमार साहित्य संमेलन, लातूर** – ज्ञान प्रबोधिनी छात्र प्रबोधन व जनकल्याण निवासी विद्यालय हरंगुळ बु., लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दिनांक ८ ऑक्टोबर रोजी लातूर येथे २६ शाळांमधील ५३७ विद्यार्थी, ६० शिक्षक व १० साहित्यिक यांच्या सक्रीय, उत्साहपूर्ण सहभागाने दिवसभराचे (सकाळी ९ ते संध्याकाळी ६) कुमार साहित्य संमेलन उत्साहात पार पडले. उद्धाटनाला **पद्मभूषण डॉ. अशोकराव कुकडे** तर समारोपाला **शिवशाहीर संतोष साळुंखे** प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. उद्धाटनाच्या

कार्यक्रमात **'ध्यासपंथावरील दीपस्तंभ'** या छात्र प्रबोधनद्वारा **अंकातील साहित्यातून प्रकाशित झालेल्या एक्काहत्तराव्या पुस्तकाचे प्रकाशन** झाले. दिवसभरात १० गटांमध्ये लेखन कार्यशाळा, लेखकांशी गप्पा असे कार्यक्रम झाले. त्यासाठी पुण्याहून डॉ. संगीता बर्वे, स्वाती ताडफळे, मृणालिनी कानिटकर-जोशी, शंतनु पांडे, डोंबिवलीहून क्षितिज देसाई व मराठवाड्यातील रेणू पाचपोर, मुकुंदराज कुलकर्णी, कैलास दौंड, बालाजी इंगळे अशा लेखकांनी मार्गदर्शन केले. मध्यंतरानंतर कल्पक भाषिक स्पर्धांमध्ये सुमारे २१० विद्यार्थ्यांनी बक्षिसे मिळवली. जनकल्याण विद्यालयातील शिक्षक, पर्यवेक्षक यांनी संमेलनापूर्वी **२१ शाळांमध्ये** छात्र प्रबोधनच्या मार्गदर्शनाने, अंकांवर आधारित **२-३ तासांचे साहित्य मेळावे** घेतले. संस्थेतील पदाधिकाऱ्यांच्या सक्रिय सहभागातून आणि सुमारे शंभर शिक्षक, पर्यवेक्षक, कार्यकर्ते व तेवढेच विद्यार्थी यांच्या मनापासूनच्या नियोजनबद्ध परिश्रमातून हे संमेलन यशस्वीपणे पार पडले.

**३. प्रबोधन दूत योजना –** जून २०२३ पासून नव्याने सुरू झालेल्या ५६ शिक्षकांच्या झेप गटाच्या व गेल्या वर्षातल्या प्रबोधन दूत योजनेतील ८३ शिक्षकांच्या भरारी गटाच्या ऑगस्ट, सप्टेंबर, ऑक्टोबर व डिसेंबरमध्ये स्वतंत्र ऑनलाईन बैठका झाल्या. झेप गटातील शिक्षकांसाठी वाचनाची गोडी वाढविण्यासाठीचे विविध उपक्रम, दिलेल्या साहित्याचा त्यासाठी कल्पकतेने कसा वापर करता येईल? वाचनवेग कसा काढायाचा, वाचन कौशल्य कसे विकसित करायचे, त्याला पूरक-पोषक अशा विविध स्पर्धा, उपक्रमांची माहिती या बैठकींमधून देण्यात आली. तर भरारी गटासाठी 'शिकण्याची हौस कशी वाढवायची' यासाठी विविध तंत्रे, पद्धती सांगण्यात आल्या. प्रत्येक बैठकीत साधारणपणे २५ ते ४५ शिक्षक उपस्थित असल्याने त्यांच्या व्हॉट्स्‌ॲप गटावर या बैठकीचे ध्वनीमुद्रण पाठवले गेले. शिक्षक व मुख्यध्यापक यांची एकत्रित बैठक झाली. त्या बैठकीत ४५ शिक्षक व ४५ मुख्याध्यापक उपस्थित होते.

या शाळांपैकी २० शाळांनी वर्गोद्दिष्ट स्पर्धेत तर ५० शाळांनी प्रगतीला बक्षीस स्पर्धेत भाग घेतला. २० शाळांनी हस्तलिखित व अभिवाचन या राज्यस्तरीय सांघिक स्पर्धांमध्ये भाग घेतला आहे. ४५ शाळांमध्ये 'जिज्ञासा ग्रंथालये' सुरू झाली आहेत. ६० शाळांनी ५५०० दिवाळी अंकांची विशेष सवलतीत नोंदणी केली. या विविध स्पर्धा व योजनांची सविस्तर माहिती खालील चौकटीत पाहता येईल.

मे २०२३ महिन्यात झालेल्या शिबिराचा पुढचा टप्पा म्हणून **प्रबोधन दूत योजनेत सहभागी असणाऱ्या शिक्षकांचे दुसरे निवासी शिबिर** १७ ते १९ नोव्हेंबर २०२३ रोजी नवनगर विद्यालय निगडी येथे पार पडले. महाराष्ट्रातील १६ जिल्ह्यांमधील २५ शिक्षक या निवासी शिबिरात सहभागी झाले होते. निवासी शिबिरात पहिल्यांदाच सहभागी झालेले प्रबोधन दूत व मागच्या शिबिरात सहभागी होऊन या वेळी दुसऱ्यांदा सहभागी झालेले प्रबोधन दूत अशा दोन्ही गटांचा विचार करून काही सत्रे एकत्रित व काही सत्र दोन गटांसाठी वेगवेगळी घेण्यात आली.

शिबिरामध्ये निगडी प्रकल्प मांडणी - मनोजराव देवळेकर, अनुभव कथन - शिवराज पिंपुडे, ज्ञान प्रबोधिनी शिक्षण प्रणाली, जोनाथन वाचन, प्रबोधन दूत आढावा, वाचन कौशल्य - महेंद्रभाई सेठिया, प्रकल्प पद्धती - नचिकेत नित्सुरे, नियोजन कौशल्ये - अमृत भट, कल्पकता - कल्पेश कोठाळे, साहित्य मेळावे - शिल्पाताई कुलकर्णी, शिक्षणातील नेतृत्व - ज्योती खरे आणि समारोप - प्रशांत दिवेकर अशी सत्रे झाली. त्याच बरोबर प्रबोधन दूत योजनेचा आढावा व पूरक उपक्रमांबाबत काही सत्रे झाली.

चिंचवड मधील वारसा स्थळांना सहाध्याय भेट व जोनाथन या पुस्तकाचे वाचन व चर्चा या शिबिरात करण्यात आली. कौशल्यांची व सकारात्मकतेची शिदोरी घेऊन सर्व प्रबोधन दूत आपापल्या गावी परतले.

नोव्हेंबर-डिसेंबर मध्ये झेप ४ या गटात नव्याने ३५ प्रबोधन दूतांची निवड करण्यात आली. या सर्वांना रु. १२०० चे साहित्य पाठविले गेले. या योजनेची उद्दिष्ट व स्वरूपाबाबत माहिती देण्यासाठी त्यांची पहिली ऑनलाइन बैठक २२ डिसेंबर रोजी पार पडली. त्याला ३५ शिक्षक उपस्थित होते.

**खालील फोटोंवर क्लिक करून कुमार साहित्य संमेलनाची आणि शिक्षक शिबिराची झलक पाहा.**






लातूर, कुमार साहित्य संमेलन



प्रबोधन दूत निवासी शिबिर, निगडी

**वर्ग ग्रंथालय योजना, जिज्ञासा ग्रंथालय योजना, वर्गोद्दिष्ट स्पर्धा, प्रगतीला बक्षीस स्पर्धा यांचे तपशील पाहण्यासाठी येथे क्लिक करा.**

**५. Indian Roots च्या पदाधिकाऱ्यांसोबत बैठक –** सोमवार दिनांक सौर अग्रहायण १३, ४ डिसेंबर २०२३, रोजी इंडिअन रूट्स, अमेरिका या संस्थेचे संस्थापक श्री. मुकुंद खिस्ती, आत्ताच्या उपाध्यक्षा श्रीमती अर्चना ओक, श्री. रवींद्र ओक व कु. राधा यांनी छात्र प्रबोधनला सदिच्छा भेट दिली. त्यांनी गेल्यावर्षी दिलेल्या भरीव आर्थिक योगदानातून सुरू झालेल्या 'जल्लोष वाचनाचा' या प्रकल्पांतर्गत सुरू असणाऱ्या प्रबोधन दूत योजनेचे व अन्य उपक्रमांचे निवेदन मा. महेंद्रभाईंनी फोटो, व्हिडीओ व पुस्तिकेच्या साहाय्याने केले. आगामी काळातील नियोजित कार्याबद्दलही थोडक्यात मांडणी करण्यात आली. श्री. मुकुंद खिस्ती व त्यांच्या सहकाऱ्यांनी चालू कामाबाबत सकारात्मक प्रतिसाद देताना आर्थिक साहाय्याव्यतिरिक्त स्वतः online बैठकीत सहभागी होऊन प्रत्यक्ष काम पाहण्याची व प्रबोधन दूतांशी संवाद साधण्याची उत्सुकता दर्शविली. या प्रकल्पात अमेरिकेतील सदस्य कशाप्रकारे योगदान करू शकतील याबाबतही चर्चा झाली. या संस्थेने छात्र प्रबोधनला पुढील वर्षासाठीही भरीव आर्थिक योगदान केले आहे.

**६. प्रबोधन संवादक व विकासिका योजना – व्याख्यान**

जुलै महिन्यातील उपक्रम राष्ट्रीय सौर शके १९४५, वार दि. २९ जुलै २०२३ रोजी 'प्रबोधन विकासिकाचा' पहिला ऑनलाइन गप्पांचा कार्यक्रम झाला. कर्तृत्ववान व्यक्तींशी गप्पा या सत्रामध्ये मुलांनी उत्स्फूर्तपणे प्रश्न विचारून लेखक मा. एकनाथ आव्हाड यांच्याशी मनमोकळ्या गप्पा मारल्या. तर दुसरा ऑनलाइन गप्पांचा कार्यक्रम ऑगस्ट महिन्यात लेफ्टनंट कर्नल मा. हृषिकेश बर्डे यांच्या उपस्थितीत झाला. दोन्ही कार्यक्रमांना मिळून सुमारे ५० विद्यार्थी आणि ५ संवादक उपस्थित होते.

तर २५ ऑगस्ट २०२३ प्रबोधन संवादक व्याख्यानमाला या सत्रातील ऑनलाईन दुसरे व्याख्यान झाले. 'नियोजन कौशल्य' या पुस्तकावर आधारित 'योजकतेच्या पाऊलवाटेवर चालताना...' या विषयावर श्री. महेंद्र सेठिया यांनी मार्गदर्शन केले. या सत्राला १३ पालक उपस्थित होते.

**४. जिज्ञासा ग्रंथालय योजना –** या योजनेला जानेवारी २०२३ पासून सुरुवात झाली. जानेवारी २०२३ ते जून २०२३ पर्यंत प्रायोगिक स्तरावर ६ शाळा सहभागी होत्या. जुलै २०२३ ते डिसेंबर २०२३ या कालावधीत आता ४३ शाळा 'जिज्ञासा ग्रंथालय' योजनेत सहभागी झाल्या आहेत. या योजनेअंतर्गत जिज्ञासा ग्रंथालय संचात एकपानी ४० पुस्तके, ६ पानी ४० पुस्तके व २० छात्र प्रबोधन मासिक अंक यांचा समावेश असतो. ही ग्रंथालये उभी करण्यासाठी प्रबोधिनीच्या अमेरिकेतील कार्यकर्त्या स्वप्नीता दाते यांनी विशेष आर्थिक योगदान दिले आहे. या योजनेला स्पर्धेची जोड दिली आहे. स्पर्धेचा भाग म्हणून विद्यार्थ्यांनी किमान ३० पुस्तके व ४०० पाने वाचावीत. त्यांच्या नोंदी कराव्यात त्यावर विचारलेले प्रश्न विद्यार्थ्यांनी सोडवावेत, लेखाबद्दल काय वाटले ते स्वतंत्र वहीत लिहावे. शाळेतून ५ निवडक वह्या शिक्षकांनी छात्र प्रबोधनला पाठवाव्यात. शालेय स्तरावर सर्वोत्तम ३ विद्यार्थ्यांना तसेच राज्यस्तरावर ३ विद्यार्थ्यांना पुस्तकरूपाने बक्षिसे दिली जाणार आहेत.

**५. हस्तलिखित व अभिवाचन स्पर्धा – कार्यशाळा –**

ज्ञान प्रबोधिनी छात्र प्रबोधन पुणे व मातृमंदिर विश्वस्त संस्था निगडी पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय लेखन संपादन (हस्तलिखित) स्पर्धा २०२४ व अभिवाचन स्पर्धा २०२४ आयोजित करण्यात आली आहे. हस्तलिखित स्पर्धेसाठी २८ संघ (२२ शाळा) तर अभिवाचन स्पर्धेसाठी ४४ संघ (२३ शाळा) यांनी नोंदणी केली आहे. **पुणे, निगडी, बारामती, डोंबिवली, कराड, इचलकरंजी, चोपडा, बदलापूर, अहमदनगर, कणकवली, चाळीसगाव, मांची हिल, लातूर** येथील शाळांचा सहभाग आहे. ५ जानेवारीपर्यंत हस्तलिखित व अभिवाचनाचे व्हिडीओ जमा होतील व परिक्षण होऊन १५ फेब्रुवारी दरम्यान निर्णय जाहीर होईल व बक्षिसांचे वितरण होईल. स्पर्धेतील सहभागाची गुणवत्ता वाढण्यासाठी व स्पर्धेबाबतचे शंका निरसन करण्यासाठी दोन्ही विषयांवर स्वतंत्रपणे ऑनलाइन कार्यशाळा घेण्यात आल्या. ❖ लेखन संपादन (हस्तलिखित) कार्यशाळा दिनांक ७ डिसेंबर २०२३ रोजी संपन्न झाली. लेखन मार्गदर्शन लेखिका, कवयित्री आश्लेषा महाजन यांनी केले. तर संपादन मार्गदर्शन कार्यकारी संपादक शिल्पा कुलकर्णी यांनी केले. ❖ अभिवाचन कार्यशाळा दिनांक ८ डिसेंबर २०२३ रोजी संपन्न झाली. गद्य अभिवाचन कसे करावे मा. अक्षय वाटवे यांनी केले

**फोटोंवर क्लिक करून त्या–त्या उपक्रमाची झलक पाहा.**







**हस्तलिखित कार्यशाळा**





'जिज्ञासा ग्रंथालय' पुस्तक सूची व स्पर्धा



विद्यार्थी संपादक मंडळातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



मा. स्वप्नीता दाते यांची विभागाला भेट



सेवक वर्गाला भेट

व पद्य अभिवाचन कसे करावे कल्पना शिरोडे यांनी व संहिता कशी लिहावी लेखिका, कवयित्री आश्लेषा महाजन यांनी केले. दोन्ही कार्यशाळेत प्रत्येकी सुमारे ४५० ते ५०० विद्यार्थी सहभागी झाले होते.

**५. वर्गोद्दिष्ट स्पर्धा –** एप्रिल ते डिसेंबर या कालावधीत मोहीम सार्वजनिक स्वच्छतेची, ५० व्यावसायिकांच्या मुलाखती, १०१ बातम्यांचा कात्रण संग्रह, स्वकमाईतून १००० रुपये कमवून गरजू संस्थेला देणगी देणे, ३ गीतांचे समूहगायन, ५० कलाकृतींचे प्रदर्शन, ५००० पानांचे वाचन, ५० कथाकथने या वर्गोद्दिष्ट स्पर्धा झाल्या. या स्पर्धांमध्ये बक्षिसपात्र १८ वर्गांना प्रत्येकी रु. १०००/- ची बक्षिसे पुस्तकरुपाने तर उत्तेजनार्थ ५ वर्गांना ५०० रुपयांचे पुस्तकसंच पाठविले गेले. डिसेंबर महिन्यातील १किलोमिटरची दौड या स्पर्धेचे परिक्षण चालू आहे. पुणे, सातारा, कोल्हापूर, लातूर, सोलापूर या गावांमधील विद्यार्थी बक्षिसपात्र ठरले आहे.

**❖ संकीर्ण –** ✻ दसऱ्याच्या आत अंक छापायला जाणे आणि शाळांना सुट्टी लागायच्या आत अंक पोहोचणे या दोन्ही गोष्टी यावर्षी साध्य झाल्यामुळे त्या आनंदात अजून कुणाला तरी सहभागी करून घेण्याच्या कल्पनेतून प्रबाधिनीतल्या विविध विभागांतील सेवक वर्गातील सुमारे ३५ सदस्यांना विभागात बोलवून चहापानाचा व गप्पांचा छोटेखानी कार्यक्रम झाला. त्या सर्वांना छात्र प्रबोधनतर्फे एक नित्य दिवाळी अंक, दोन पणत्या आणि लाडूचे पाकीट भेट स्वरूपात देण्यात आले. हा कार्यक्रम सेवक वर्गाला आणि आम्हालाही भावूक आणि आनंददायी ठरला. ✻ **आषाढी एकादशी कार्यक्रम –** वारी निघाल्यापासून विभागामध्ये संत साहित्यिक सदानंद मोरे यांचे वर्तमानपत्रातील सदराचे वाचन, एक अभंग आणि विठ्ठलाची पूजा आणि प्रसाद असे नित्य होत होते आणि आषाढीच्या दिवशी विभागातील सर्व सदस्यांनी पंचपदी, अभंग गायन व त्याचे निरूपण, आरती अशी भजनोपासना केली. ✻ **विद्यार्थी मंडळ कौतुक समारंभ –** विद्यार्थी मंडळातील व इंग्रजी अंकाच्या संपादक मंडळातील युवतींनी विशेष शैक्षणिक यश मिळविल्याबद्दल दिनांक २२ जून २०२३ रोजी, कु. ईशानी फडके (इ. १० वी) ९९%, स्वामिनी हर्षे (इ. १२ वी, कलाशाखा) ९४%, मृण्मयी भट (बी.ए. इंग्रजी) ८४% यांचे विभागातर्फे कौतुक करण्यात आले. ✻ **सदिच्छा भेट –** ज्ञान प्रबोधिनी फाऊंडेशन, अमेरिका याच्या कार्यकारिणी सदस्या आणि ज्यांच्या देणगीतून जिज्ञासा ग्रंथालय सुरू करण्यात आले अशा अमेरिकेतील श्रीमती स्वप्नीता दाते यांनी विभागाला सदिच्छा भेट दिली.

## पुढील तीन महिन्यातील नियोजित कार्यक्रम

**१. मासिक –** ✻ छात्र प्रबोधनचे ३ नित्य अंक व सुबोध द्वैमासिकाचे ३ अंक प्रकाशित होतील.
✻ संपादक मंडळ बैठक होईल.

**२. पुस्तक निर्मिती –** ✻ एका पुस्तकाची नवीन आवृत्ती ✻ तीन पुस्तकांच्या पुढील आवृत्त्या
✻ कर्तृत्वाच्या कहाण्या ६ पानी ३० पुस्तकांचा संच ✻ दोन मराठी पुस्तकांच्या इंग्रजी आवृत्त्या

**३. उपक्रम व स्पर्धा –** ✻ ३ महिन्यांच्या वर्गोद्दिष्ट स्पर्धा व आधीच्या एका महिन्याचा निर्णय
✻ प्रबोधन दूत, प्रबोधन संवादक व प्रबोधन विकासिका या उपक्रमांतर्गत मासिक ऑनलाईन व्याख्याने, बैठका व गप्पांचे कार्यक्रम, एक दिवसीय कार्यशाळा
✻ शिक्षक व मुख्याध्यापकांसाठी प्रबोधिनी परिचय सहल
✻ जिज्ञासा ग्रंथालय योजनेअंतर्गत २५ ग्रंथालयांना नव्याने प्रारंभ
✻ २० ठिकाणी साहित्य मेळावे व एका ठिकाणी कुमार साहित्य संमेलन

**४. अन्य –** ✻ विभागातील सदस्यांसाठी मासिक बैठकी ✻ संकेतस्थळाचे नूतनीकरण ✻ स्नेहमेळावा